CMYK


घराला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान
>> पान 2
ताकाला जायचं आणि भांड लपवायचं असं माझं धोरण नाही,
>> पान 3
तलवारीने वार, पोलिसांनी केला गोळीबार!
>> पान 4
**सुविचार**

स्वतःला सुधारण्यात इतके व्यस्त व्हा, की दुसऱ्याच्या चुका शोधण्याइतका तुम्हाला वेळच नाही मिळाला पाहिजे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



विधानसभेसाठी महायुतीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला? बावनकुळेंनी सांगितली आतली गोष्ट!
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 26 ■ सोमवार, दि. 02 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात पावसाची संततधार सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गुजरात किनारपट्टीवर घोंगावणाऱ्या चक्रीवादळाने राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील विविध जिल्ह्यात पुढील चार दिवस मुसळधार होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यादरम्यान मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांना जोरदार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून विविध ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. तर सकाळपासून नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, बीड जिल्ह्यात मुसळधार पाऊस होत आहे. यामुळे जनजीवण विस्कळीत झाले असून पावसामुळे शेतकरी



सुखावले आहेत. पावसामुळे फुलोऱ्यात असलेल्या पिकाना नव संजीवनी मिळाली आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस झाला असून इतर विभागांच्या तुलनेत पावसाचा जोर मराठवाड्यात कमी होता. त्यामुळे येथील धरणे संथ गतीने भरत होती. मात्र गुजरात किनारपट्टीवर घोंगावणाऱ्या चक्रीवादळामुळे मराठवाड्यातही मुसळधार पावसाची हजेरी लागली आहे. यामुळे मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न काही अंश सुटणार आहे. तर मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये संततधार पावसामुळे शेतकरी सुखावला आहे.

## शेतकऱ्याची चिंता वाढली

### यवतमाळ पुस नदीला पूर

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार यवतमाळ जिल्ह्यात शनिवारी (ता.३१) सायंकाळपासून जोरदार पाऊस होत आहे. मुसळधार पावसामुळे विदर्भ-मराठवाडा सीमेवरील महागाव तालुक्यातील धनोडा येथे पैनगंगा नदीचे पाणी पुलावरून वाहत आहे. तसेच पुसद येथील पुस नदीला पूर आला आहे. यामुळे यवतमाळ-माहूर, किनवट हा मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला होता. तर संततधार पावसामुळे यवतमाळमधील पुसदच्या खंडाळा घाटात दरड कोसळली. दरड कोसळल्याने पुसद वाशिम प्रमुख मार्ग बंद झाला आहे.

**नांदेडमध्ये 'मुसळधारा'**

हवामान विभागाने नांदेड जिल्ह्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला असून रविवारी (ता.१) पहाटेपासूनच नांदेडमध्ये मुसळधार पाऊस सुरु झाला आहे. येथील किनवट तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्याने तेलंगणा आणि नांदेडचा संपर्क तुटला आहे. तेलंगणा सीमेवरच्या शिवणी ते अप्पारावपेठदरम्यान वाहणारे नाले, ओढे ओसंडून वाहत असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तर नद्या नाल्यांचे पाणी पात्राबाहेर पडल्याने शेतात पाणी शिरले आहे. यामुळे शेतीचे देखील नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. तर मुसळधार पावसामुळे येथील सहस्त्रकुंड धबधबा प्रवहीत झाला आहे.



>> पान २

## विमानात बॉम्ब असल्याची अफवा, नागपूर विमानतळावर इमर्जन्सी लॅण्डिंग

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : विमानात बॉम्ब असल्याची माहिती मिळताच इंडिगोने इमर्जन्सी लॅण्डिंग केलं आहे. नागपूर विमानतळावर हे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. जबलपूरवरून हैदराबादच्या दिशेनं जाणाऱ्या विमानात बॉम्ब असल्याची माहिती मिळाल्याने विमानाचे नागपूर विमानतळावर इमर्जन्सी लॅण्डिंग करण्यात आलं. या घटनेमुळे चांगलीच खळबळ उडाली. प्रवासी आणि विमानतळावर तणावाचं वातावरण होतं.

विमानातील प्रवाशांचे सामान विमानात ठेवून प्रवाशांना बाहेर काढलं जात आहे. विमानाची बॉम्ब स्क्वाड, डॉग पथक, स्थानिक बॉम्ब नाशक पथक तपासणी करत आहे. नागपूर विमानताळवरवरून थोड्या वेळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार प्रवास करणार असल्याने विमानतळ प्रशासन अलर्टवर आहे. याच दरम्यान बॉम्बची >> पान २

## अजितदादांनी दुसऱ्यांदा संघ भूमीवर जाणे टाळले, काय आहे कारण?



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : भाजपची सत्ता असताना संघाचा प्रभाव अधोरेखित करण्याचे प्रयत्न नेहमीच भाजप नेत्यांच्या माध्यमातून केले जाते. केंद्राचा मंत्री आला की त्याची रेशीमबागेतील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्मृती मंदिराची भेट ठरवली जाते. त्याचा प्रसार आणि प्रचारही व्यवस्थित केला जातो. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर हिवाळी अधिवेशना दरम्यान नागपुरात आलेले भाजपचे आमदार आणि मंत्री एकदिवस स्मृती मंदिराला भेट देऊ लागले . त्यानंतर भाजपच्याच नेतृत्वात स्थापन झालेल्या एकनाथ शिंदे सरकारच्या आतापर्यंतच्या कार्यकाळात भाजप आमदारांची स्मृती मंदिर भेटीची परंपरा कायम आहे.

२०२३ मध्ये महायुतीत अजित पवार यांचा समावेश झाला. त्यानंतर झालेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनात भाजप आमदार स्मृती मंदिरात गेले, पण अजित पवार आणि त्यांचे आमदार, मंत्री तेथे गेले नव्हते. ३१ ऑगस्टला महायुतीचा महिला मेळावा नागपुरात झाला. यानिमित्ताने नागपुरात आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृती मंदिरात >> पान २

## निवडणुकीत विरोधात काम केलं म्हणून दुकानात घुसून बेदम मारलं, ९ जणांविरोधात गुन्हा दाखल

**बीड/प्रतिनिधी** : बीडमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दुकानात घुसून एकाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. या संपूर्ण घटनेचा एक व्हिडीओ देखील समोर आला आहे. बीड जिल्ह्यातील माजलगावमध्ये ही घटना घडली आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत विरोधात काम केल्याचा राग मनात धरून दुकानात घुसून बेदम मारहाण करण्यात आली आहे. या घटनेनं शहरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात ९ जनांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे यामध्ये एका महिलेचा देखील समावेश आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की,ग्रामपंचायत निवडणुकीत विरोधात काम केल्याचा राग मनात धरून दुकानात घुसून एकाला बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार बीडच्या माजलगाव शहरात उघडकीस आला आहे. मारहाण करतानाची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. तीन ते चार पुरूष आणि एका महिलेने दुकानात शिरून एका व्यक्तीला बेदम मारहाण केली. अशोक बाळासाहेब सोळंके असं मारहाण करण्यात आलेल्या व्यक्तीचं नाव आहे. ते या घटनेत जखमी झाले असून, त्यांच्यावर माजलगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**गुन्हा दाखल**

एक महिला आणि तीन ते चार पुरूष यांनी दुकानात घुसून अशोक सोळंके यांना बेदम मारहाण केली, दुकानात शिरल्यानंतर त्यांनी दुकान लावून घेतलं आणि नंतर सोळंके यांना मारहाण करण्यात आली. या घटनेत सोळंके हे जखमी झाले आहेत, दरम्यान याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात ९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## छत्रपतींच्या नावाने मतांसाठी राजकारण करणाऱ्यांचा जनताच कार्यक्रम करणार – मनोज जरांगे पाटील

दैनिक आपला विदर्भ

**सावंतवाडी/प्रतिनिधी** : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मालवण राजकोट किल्ल्यावर भेट दिली. ते म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राजकारण करणाऱ्यांचा जनताच कार्यक्रम करणार आहे, पुतळा दुर्घटनेतील दोषी पळून कसे जाऊ शकतात. राजकोट किल्ल्यावर टिकाऊ मोठे स्मारक उभारले पाहिजे.''

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज मराठा बांधवांसह मालवणमधील राजकोट किल्ल्यावर भेट देऊन शिवपुतळा दुर्घटनेची पाहणी केली. ''मी शिवरायांचा मावळा असून मी राजकोट येथे शिवपुतळा दुर्घटनेची पाहणी करण्यासाठी आलो आहे, मला या विषयावरून कोणतेही राजकारण करायचे नाही. शिवरायांचा पुतळा कोसळण्यावरुन विरोधक व सत्ताधारी यांनी राजकारण करू नये. पुतळा कोसळल्याचे त्यांना दुःखच झाले नाही, दुःख असते तर राडा झाला नसता. छत्रपतींच्या नावाचा वापर केवळ सत्तेसाठी होत असून छत्रपतींच्या नावे राजकारण करणाऱ्यांचा जनताच कार्यक्रम करणार आहे, पुतळा दुर्घटनेतील दोषी पळून कसे जाऊ शकतात, त्यांना शोधून योग्य तो तपास झाला पाहिजे, दोषी व्यक्ती कोणत्याही मंर्त्याचा मित्र असू दे, तो पंतप्रधानांचा जरी मित्र असला तरी त्याला पकडून जेलमध्ये सडवला पाहिजे.'', असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.



तसेच राजकारण न करता राजकोट येथे शिवरायांचे प्रचंड मोठे असे आणि टिकाऊ स्मारक उभे राहिले पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## पुढील ३ महिन्यात धावणार वंदे भारत स्लीपर; रेल्वेमंत्र्यांकडून पाहणी अन् तिकीटाबाबतही बोलले

बंगळुरू : देशातील सर्वात हायस्पीड वंदे भारत ट्रेनने नुतकेच शतक पूर्ण केले असून प्रवाशांनाही या ट्रेनची भुरळ पडली आहे. देशातील लांब पल्ल्याच्या विविध मार्गावर ही ट्रेन सुरू झाल्यानंतर प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद या ट्रेनला मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवार ३१ ऑगस्ट रोजी देशातील आणखी ३ नवीन वंदे भारत ट्रेनना हिरवा झेंडा दाखवला. त्यामुळे, देशातील वंदे भारत ट्रेनची संख्या आता शतकेपार गेली आहे. मोदींच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरू झालेल्या या नवीन तीन ट्रेन चेन्नई ते नागरकोइल, मदुराई ते बेंगळुरू आणि मेरठ ते लखनौ या मार्गावर धावणार आहेत. विशेष म्हणजे दुसऱ्याच दिवशी वंदे भारतसंदर्भात आणखी एक गुडन्यूज समोर आली आहे >> पान २

# शिवरायांच्या सन्मानासाठी मुंबईकर रस्त्यावर

## मुंबईत भगवं वादळ; जयघोषाने गेटवे परिसर दुमदुमला




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आठ महिन्यांत कोसळल्यानंतर महायुती सरकारचा निषेध करण्यासाठी महाविकासआघाडीचे नेते आज रस्त्यावर उतरले.

महाविकासआघाडीच्या नेत्यांकडून रविवारी १ सप्टेंबर रोजी 'जोडे मारा' आंदोलनाची हाक देण्यात आली होती.

यावेळी मुंबईतील हुतात्मा चौक ते गेटवे ऑफ इंडियापर्यंत महाविकासाआघाडीकडून मोर्चा काढण्यात आला.

त्यानंतर गेट वे ऑफ इंडिया परिसरात मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शन करत 'जोडे मारा' आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे महाविकासआघाडीतील प्रमुख नेते उपस्थित होते.

या आंदोलनसाठी महाविकास आघाडीचे प्रमुख नेते आणि तिन्ही पक्षाचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा स्वाभिमान त्यांचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही, असं म्हणत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष केला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देत हुतात्मा चौकापासून शेकडो कार्यकर्ते गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाले. या पार्श्र्वभूमीवर आज हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया परिसरात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मुंबईत ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलिसांकडून बॅरिकेटींग करण्यात आली.

तसेच मोठ्या प्रमाणात फौजफाटाही तैनात करण्यात आला. तसेच हुतात्मा चौकापासून गेट ऑफ इंडियापर्यंतचा परिसर नो पार्किंग झोन करण्यात आला होता. त्यासोबतच पर्यटकांसाठी गेट वे ऑफ इंडिया बंद करण्यात आले होते.

यावेळी शिवरायांच्या सन्मासाठी सुट्टीच्या दिवशी मुंबईकर रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे मुंबईत भगवं वादळ पाहायला मिळालं. यावेळी जय जय, जय जय, जय शिवाजीच्या अशा घोषणाही करण्यात आला. त्यामुळे गेटवे परिसर दुमदुमला.

## महाविकास आघाडी कधीच छत्रपती शिवरायांचा सन्मान करत नाही, देवेंद्र फडवणवीसांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाविकास आघाडीच्या वतीनं आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याप्रकरणी मुंबईत सरकार विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. मात्र महाविकास आघाडी कधीच छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मान करत नाही. महाविकास आघाडीकडून करण्यात येत असलेलं आंदोलन हा केवळ राजकारणाचा भाग आहे, असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर जोरदार टीकास्त्र सोडलं.

महाविकास आघाडीचं आज गेट वे ऑफ इंडियाजवळ आंदोलन : मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावरील



छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्यानंतर राज्यात मोठं राजकारण पेटलं आहे. महाविकास आघाडीच्या वतीनं या प्रकरणी राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. आज महाविकास आघाडीच्या वतीनं मुंबईतील गेट वे ऑफ इंडियाजवळ सरकार विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. महाविकास आघाडीचे नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले, संजय राऊत, वर्षा गायकवाड, खासदार शाहू महाराज, खासदार सुप्रिया सुळे आदी नेते या आंदोलनात सहभागी झाले आहेत. महाविकास आघाडीच्या वतीनं गेट वे ऑफ इंडिया परिसरात मोठी घोषणाबाजी करण्यात आली.

महाविकास आघाडी कधीच शिवरायांचा सन्मान करत नाही : महाविकास आघाडीच्या वतीनं मुंबईतील गेट वे ऑफ परिसरात आंदोलन करण्यात येत असल्यानं राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला जोरदार चपराक लगावली आहे. महाविकास आघाडीचं आंदोलन केवळ राजकारणाचा भाग आहे. महाविकास आघाडी कधीच छत्रपती शिवरायांचा सन्मान करत नाही. आज करण्यात येत असलेलं आंदोलन हा देखील केवळ राजकारणाचा दिखावा आहे, असा जोरदार हल्लाबोल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

CMYK

## गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून आज १३० वर्ष झाली. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज गणेशोत्सव हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरु झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी, असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली गणेश मंडळांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा–मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. रक्तदान शिबिर, दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

# घराला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान

## संपूर्ण घर भक्षस्थानी; संसारोपयोगी साहित्य जळून खाक

दैनिक आपला विदर्भ

**देऊळगावराजा/प्रतिनिधी** : स्थानिक अहिंसा मार्गावरील राहत्या घराला आग लागून संपूर्ण घर आगीच्या भक्षस्थानी पडल्याची घटना दिनांक ३१ ऑगस्टच्या रात्री ११.४५ ते १२.०० वाजेदरम्यान घडली. या घराला लागून असलेल्या दुसऱ्या घरालाही या आगीची झळ पोहचली. या आगीत दोन्ही घराचे मिळून ३ लक्ष ९० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने या आगीमध्ये कोणतीही जीवीतहानी झाली नाही. घटनेची सूचना मिळताच मुख्याधिकारी अरुण मोकळ





यांनी अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी पाठवली. त्यामुळे आगीवर लवकर नियंत्रण मिळून पुढील अनर्थ टळला. कारण सदर घर भरवस्तीत असल्यामुळे इतरही घरे या आगीच्या विळख्यात आली असती.

स्थानिक अहिंसा मार्गावर कांतीलाल माणिकराव सुपारकर व जितेंद्र गोविंदराव सतकर यांची घरे आहेत. दिनांक ३१ ऑगस्टच्या रात्री ११.४५ ते १२.०० वाजेच्या दरम्यान कांतीलाल माणिकराव सुपारकर यांच्या घराला अचानक आग लागली. या आगीत सुपारकर यांचे संपूर्ण घर भक्षस्थानी पडले. तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या आदेशावरून आज तलाठी राजू तागवाले यांनी या नुकसानीचा पंचांसमक्ष पंचनामा केला. या पंचनाम्यानुसार या आगीत कांतीलाल सुपारकर यांचे एकूण ३ लक्ष ६० हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. यामध्ये सुपारकर यांच्या घरातील १ लक्ष रुपयाची रोकड जळाली. तसेच २ लक्ष रुपयांचे संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. घरावरील ४० ते ४५ टीनपत्रेही जळाली. त्याचप्रमाणे व्यवसायाचे साधन असलेला भेळपुरीच्या गाडा, ५ तेलाचे डब्बे, ३ वाटाण्याचे कट्टे, १ मैद्याचा कट्टा असे ६० हजार रुपयांचे साहित्य जळाले. या आगीमध्ये गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले. या आगीत सुपारकर यांचे ३ लक्ष रुपयांचे नुकसान झाले.

या आगीमध्ये कांतीलाल सुपारकर यांच्या शेजारील जितेंद्र गोविंदराव सतकर यांच्या घरालाही आगीची झळ पोहचली. यामध्ये सतकर यांच्या दोन मजली घरातील इलेक्ट्रिक फिटींग, एक कुलर व इतर साहित्य मिळून ३० हजार रुपयांचे नुकसान झाले.

या आगीमुळे कांतीलाल सुपारकर यांच्या कुटुंबावर बेघर होण्याची वेळ आल्यामुळे शासनाने सुपारकर व सतकर यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## विधानसभेसाठी महायुतीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला? बावनकुळेंनी सांगितली आतली गोष्ट!

**नागपूर/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका बसला. महायुतीमधील अनेक दिग्गज उमदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. तर दुसरीकडे महाविकास आघाडीनं मात्र राज्यात जोरदार मुसंडी मारल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान आता विधानसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. विधानसभा निवडणुकीचं वारं जोरदार वाहू लागलं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शनिवारी महायुतीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



नेमकं काय म्हणाले बावनकुळे?

'काल महायुतीची बैठक झाली, जागा वाटपाबाबत काही चर्चा झाली. पुढच्या दहा दिवसांत १० तारखेपर्यंत जागा वाटपाची चर्चा पूर्ण होईल. पत्रकार परिषद घेऊन आमचे नेते जागा वाटप जाहीर करतील. काही जागा वाटपाबाबत आमचं एकमत झालं आहे. आम्ही कुठलीही आकडेवारी मांडली नाही, जो जिंकेल त्याला ती जागा देण्याचा निर्णय झाला आहे. महायुतीच्या मित्रपक्षांनाही जागा देण्याबाबत चर्चा झाली आहे, असं बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की जागा किती कोणाला मिळाव्या हे महत्त्वाचं नाही. राज्यात आमच्या योजना पुढे नेण्यासाठी महायुतीचं डबल इंजिनचं सरकार हवं आहे. आमचा जागेसाठी आग्रह नाही तर जिंकण्यासाठी प्राथमिकता आहे. महायुतीला १३ मित्र पक्ष आहेत, जागा वाटपात त्यांचाही विचार होणार आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि मी या बैठकीला उपस्थित होतो.

पान १ वरून...

### महाराष्ट्रातील अनेक

**हिंगोलीतही जोरदार पावसाला सुरुवात**

हिंगोली जिल्ह्यांमध्ये देखील रात्रीपासून विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरु आहे. येथे मागील आठ ते दहा दिवसापासून पावसाने दडी मारली होती. पण रात्रीपासून पावसाने हजेरी लावल्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या सर्वसामान्यांसह शेतीतील पिकांना पावसाचे पाणी मिळाल्याने शेतकरी समाधानी झाला आहे.

**परभणीत वादळी वाऱ्यांचा पाऊस**

हवामान खात्याने पावसाचा इशारा दिल्यापासून परभणीच्या ग्रामीण भागात मुसळधार पावसचे आगमन झाले आहे. पहाटेपासून मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस होत असल्याने परभणीतील अनेक रस्त्यांवर पाणी साचले.

**जायकवाडी ८२ टक्के भरले**

दरम्यान, मराठवाड्यातील सर्वांत महत्त्वाचे असलेले जायकवाडी धरण मागील दोन ते तीन आठवड्यापूर्वी ४० टक्क्याच्या आसपास होते. तर कमी अधीक प्रमाणात होणाऱ्या पावसासह नाशिक आणि अहमदनगरमध्ये चांगला पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात जायकवाडी धरणासाठी विसर्ग केला जात आहे. सध्या धरण ८२ टक्के भरले आहे. तर नाशिक जिल्ह्यातील धरणांमधून आतापर्यंत ३४ टीएमसी आणि अहमदनगर जिल्ह्यातील धरणांमधून २१.६ टीएमसी पाण्याचा विसर्ग जायकवाडीकडे करण्यात आला आहे. त्यामुळे आता धरणात ८२ टक्के पाणीसाठा झाल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

**बिंदुसरा धरण ओवरफ्लो**

बीड जिल्ह्यात देखील मुसळधार पावसाला सुरुवात झाली असून जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाने हजेरी लावलेली आहे. यामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणे आणि तलाव भरले आहे. तर यादरम्यान येथील बिंदुसरा धरण देखील भरले आहे. तर गेल्या काही दिवसांपासून या धरणातील पाणीसाठी उणे झाला होता. यामुळे आजुबाजूच्या २० ते २५ गावांना पाण्याच्या संकटाला तोंड द्यावे लागेल असे चित्र निर्माण झाला होता. मात्र गेल्या दोन दिवसापासून पडणाऱ्या पावसामुळे बिंदुसरा धरण पुर्णक्षमतेनं भरले आहे. यामुळे जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न सध्यातरी सुटला आहे.

### विमानात बॉम्ब असल्याची अफवा

विमानात बॉम्ब असल्याची अफवा उडाल्याने खळबळ उडाली. इंडिगोचे विमान रविवारी सकाळी ७.५५ वाजता जबलपूरहून निघाले. मिळालेल्या माहितीनुसार, फ्लाइट लँडिंग केल्यानंतर प्रवाशांचे सर्व सामान, मोबाईल फोन्स फ्लाइटच्या आत ठेवण्यात आले आहेत, तर प्रवाशांना फ्लाइटमधून खाली उतरवण्यात आले आहे. एवढेच नाही तर या फ्लाइटला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी घेरले आहे. जबलपूर विमानतळाच्या संचालकांनी उड्डाण वळवण्यात आल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे, पण ते का करण्यात आले हे सांगण्यास नकार दिला आहे. प्रवाशांना बसने हैदराबादला नेण्यात आले आहे.

### अजितदादांनी दुसऱ्यांदा

जाऊन डॉ.हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांच्या समाधीचे दर्शन घेतले, पण याच कार्यक्रमाला आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तेथे जाणे टाळले, असे त्यांनी आतापर्यंत दुसऱ्यांदा केले. ते दीक्षाभूमीला भेट देण्यासाठी गेले होते हे येथे उल्लेखनीय. काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. तेंव्हा धर्मनिरपेक्षता हा पक्षाचा मुळ पाया होता.या पक्षाने कधीही हिंदुत्ववादी पक्षाशी हातमिळवणी केली नाही. अजित पवार यांनी पक्षच पळवला,भाजपसोबत युती केली, पक्ष सत्तेत सहभागी झाला. पण अजित पवार हिंदुत्ववादी पक्षासोबत गेल्याने राष्ट्रवादीला मत देणारा धर्मनिरपेक्ष आणि गैर हिंदुत्ववादी मतदार अजित पवार यांच्यावर नाराज झाला. याशिवाय संघाची विचारसरणी आणि राष्ट्रवादीची विचार भिन्न आहेत.

मनुवादाला राष्ट्रवादीचा विरोध आहे. म्हणून मागच्या अधिवेशन काळात राष्ट्रवादीचे आमदार संघ भूमीवर गेले नव्हते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांना खुद्द बारामतीकरांनी नाकारले. पक्षापासून दलित,बहुजन आणि अन्य मतदारही दुरावला. अशा स्थितीत पुन्हा संघभूमीवर गेल्यास पक्षाचा पारंपारिक मतदार ( जो शरद पवार यांच्यासोबत आहेत) दुरावला जाईल,अशी भीती वाटल्याने पवार संघभूमीवर गेले नाही ,अशी चर्चा आहे. तसेच संघाच्या साप्ताहिक विवेक मधूनही अजित पवार यांच्यावर सातत्याने टीका करण्यात आली. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या पराभवास अजित पवारच कारणीभूत असल्याची भावना निर्माण करण्यात आली. यामुळे राष्ट्रवादी संघांवर नाराज आहे. नेते उघडपणे बोलत नसले तरी संघाच्या व्यासपीठावर जाणे टाळले जात आहे.




## धनगर समाजाच्या अनेक प्रलंबित मागण्या पूर्ण यासाठी सेना संघटनेचा संबोधित मेळावा



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या चांदवड नगरीमध्ये यशवंत सेना सरसेनापती माधव भाऊ गडदे यांची चांदवड मनमाड रोडवरील असलेल्या रेणुका लॉन्स मध्ये भव्य मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये शासनाकडे धनगर एसटी आरक्षण अमलबजावणी धनगर समाजासाठी वाड्या वस्ती वरती राहणारा हा समाज यांच्या विकासासाठी राज्य सरकारने भरघोस निधी उपलब्ध करून द्यावा धनगर समाजातील मुला मुलींसाठी प्रत्येक तालुका स्तरावर वस्तीगृह निर्माण करावे यशवंतराव होळकर यांच्या नावाने स्वतंत्र महामंडळाची निर्मिती करून सहन रोजगारासाठी भरघोस निधी उपलब्ध करून द्यावा अशा विविध मागण्यांसाठी आज या ठिकाणी धनगर समाजाचा यशवंत सेना या संघटनेच्या माध्यमातून घेण्यात आला यावेळी विविध मान्यवरांनी धनगर समाजावर शासन आरक्षणाच्या संदर्भात असो किंवा इतर कुठल्याही गोष्टीत आमच्याकडे लक्ष देत नाही याकरिता येणाऱ्या विधानसभेत आपली बाजू त्यांना दाखवून देऊ असे देखील माधव भाऊ घडले यांनी सांगितले. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी धनगर समाजाच्या वतीने त्यांच्या सत्कार देखील करण्यात आला. त्याचप्रमाणे यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले.

# चंद्रपुरातील पुरासाठी वेकोलि नव्हे महापालिका जबाबदार! वेकोलिचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : शहराची जीवनवाहिनी इरई आणि झरपट या दोन नद्यांना प्रदूषणापासून मुक्ती मिळावी यासाठी माजी खासदार नरेश पुगलिया यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात शहरातील पूर आणि नद्या प्रदूषणासाठी वेकोलि जबाबदार असल्याचे म्हटले आहे. आता वेकोलि चंद्रपूर विभागाच्यावतीने न्यायालयात दाखल प्रतिज्ञापत्रात राज्य सरकारच्या सर्व यंत्रणांचे आरोप बिनबुडाचे ठरवून, वेकोलिला जबाबदार धरणे हे षडयंत्र असल्याचे म्हटले आहे.



वेकोलिवर करण्यात आलेले आरोप वस्तुत: चुकीचे आहेत. याचिकाकर्ते आणि इतर प्रतिवादींनी चुकीच्या आकडेवारीच्या आधारे खोटे आरोप करून वेकोलिवर दोषारोप करण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील पुरासाठी वेकोलि नव्हे तर महापालिका व नदीपात्रालगत अनियंत्रित बांधकाम जबाबदार असल्याचा आरोप वेकोलिने केला आहे. न्यायालयाने सर्व प्रतिवादींना १२ सप्टेंबरपर्यत यावर अखेरचे उत्तर देण्यास सांगितले आहे.

वेकोलिने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, चंद्रपूर शहर आणि आसपासच्या नद्यांमध्ये घनकचरा वाहून आल्याने पूरस्थिती उद्भवते. याला चंद्रपूर महापालिका जबाबदार आहे. ही स्थिती खाणींच्या अतिभारामुळे किंवा नद्यांमध्ये माती साचल्यामुळे होत नाही. या सर्व आरोपांवर यापूर्वीच कारवाई झाली आहे. सध्याचे आणि जुने ओव्हरबोड वृक्षारोपणाने झाकण्यात आले आहे. खरे तर पूर ही एक नैसर्गिक घटना आहे, ज्यासाठी वेकोलिला जबाबदार धरता येणार नाही.

शहरातील पुरासाठी आयआयटी मुंबईच्या अभियांत्रिकी विभागाने सादर केलेल्या अहवालाला महत्त्व दिले आहे. मात्र नदीला येणाऱ्या पुरासाठी विविध कारणे जबाबदार असल्याचे अहवालात नमूद आहे. प्रत्यक्षात या अहवालात नमूद मुख्य घटकांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. इरई आणि झरपट नदीला येणारा पूर हा वेकोलिच्या ओव्हरबर्डनमुळे नाही तर नद्यांमध्ये घनकचरा सोडल्यामुळे, नदीपात्रात केल्या गेलेली अवैध बांधकामे आणि पूरनियंत्रण उपाययोजना न करता केला गेलेला विकास, यामुळे शहरातील सखल भागांना पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे, असे नमूद आहे.

न्यायालयाने १२ सप्टेंबरपर्यत सर्व प्रतिवादींना उत्तर दाखल करण्याची शेवटची संधी दिली आहे. त्यानंतरच या जनहित याचिकेवर न्यायालयाचा अंतिम निकाल येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सन २०१६–१७ पासून, वेकोलिने १२९१.०२ कोटी रुपयांची रॉयल्टी जमा केली आहे. जिल्हा खाण निधीमध्ये ३१५.४९३ कोटी रु. योगदान दिले आहे. वेकोलि चंद्रपूर जिल्ह्याला एकूण १३७५ कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम राज्य सरकारकडे जमा करण्यात आली आहे, इरई आणि झरपट नद्यांच्या स्वच्छतेसाठी किंवा सुशोभीकरणासाठी हा निधी राज्य सरकारने वापरला आहे की नाही याची कोणतीही माहिती वेकोलिकडे नाही.

### जिल्हा प्रशासन व वेकोलित संघर्ष अटळ

इरई व झरपट या दोन्ही नद्यांच्या प्रदूषणास जिल्हा प्रशासनाने वेकोलिला जबाबदार ठरविले आहे तर वेकोलिने महापालिका व नदी पात्रालगत झालेले बांधकाम पुरास कारणीभूत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे येत्या काळात न्यायालयात जिल्हा प्रशासन व वेकोलित संघर्ष अटळ असल्याचे बोलले जात आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जेजुरीत सोमवती यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांनी कायदा आणि सुव्यस्थेचे पालन करावे, सहाय्यक निरीक्षकांचे भाविकांना आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचं आराध्य दैवत खंडोबाच्या जेजुरीत उद्या सोमवती यात्रा आणि श्रावणी शेवटचा सोमवार असल्याने लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. भाविकांनी कायदा आणि सुव्यस्थेचे पालन करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाघचौरे यांनी नागरिकांना केलं आहे. सोमवती अमावास्या निमित्त श्री खंडेराया कऱ्हा नदीच्या पात्रात शाही स्नान करण्यासठी येत असून नाझरे धरण देखील भरले असल्याने भाविकांनी काळजी घ्यावी. सोमवती अमावास्या निमित्त येणाऱ्या भाविकांना कोणत्याही स्वरूपाची अडचण येऊन देणार नसल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

### जालना शहरातील एम. एस. जैन इंग्लिश स्कूल वाचवण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाने काढली शहरात भव्य रॅली




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** :जालना शहरात एम. एस. जैन इंग्लिश स्कूल वाचवण्यासाठी व एम. एस. जयंतीच्या वरिष्ठांनी शाळा बंद करण्याचा जो निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या विरोधात मराठवाडा शिक्षक संघाकडून शाळा बचाव शांतता रॅली काढण्यात आली. ही रॅली एम. एस. जैन स्कूल शाळेच्या गेट पासून सुभाष चौक, महावीर चौक, मामा चौक, वीर सावरकर चौक, सुभाष रोड, फुल बाजार, कादराबाद ,छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या परिसरात शाळेसंदर्भात शांततामय वातावरणामध्ये जनजागृती करत शाळा वाचवण्याचे घोषणा देत काढण्यात आली आहे. याप्रसंगी बोलताना मराठवाडा शिक्षक संघाचे प्रा.मारुती तेगमपुरे यांनी बोलताना आपले मत व्यक्त केले आहे की, ज्या शाळेचे १९७३ पासून आज रोजी पर्यंत जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये जे विद्यार्थी यशस्वीपणे आपली छाप सोडत आहेत, अशी शाळा बंद करण्याचा निर्णय राष्ट्रविकासासाठी बाधा ठरणारी गोष्ट आहे. तसेच शाळा बंद करणे आणि धंदा करणे या दोन्हीही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे शाळा बंद करण्याच्या विचार चुकीचा आहे. शिक्षकांच्या अडीअडचणी कशा सोडवता येतील याचा विचार शाळा व्यवस्थापनाने करावा, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केली आहे. याप्रसंगी मराठवाडा शिक्षक संघाचे सर्व शिक्षक पदाधिकारी व पालक वर्ग रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

### सरला बेटांचे महंत रामगिरी महाराज यांच्या समर्थनार्थ व बांगला देशात हिंदूंवर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ येवल्यात हिंदू हुंकार मोर्चा






दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : नाशिकच्या येवला येथे आज सरला बेटांचे महंत रामगिरी महाराज यांच्या समर्थनार्थ व बांगला देशात हिंदूंवर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज व रामगिरी महाराज यांच्या भक्त परिवारा तर्फे भव्य मोर्चा काढण्यात आला. येवल्यातील विंचूर चौफुली ते तहसील कार्यालय पर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी या ठिकाणी मोर्चा पोहचल्यावर तेथे सभेत रूपांतर झाले. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.रामगिरी महाराजांवर येवल्यात गुन्हा दाखल असल्याने या मोर्चा कडे सगळ्यांचे लक्ष लागले होते महंत रामगिरी महाराज यांच्यावरील गुन्हे मागे घेण्याचे आव्हान केले असून आम्हाला दोन मुलांचा अधिकार तर इतर समाजातील घटकांना दोन मुलांचा अधिकार असला पाहिजे अन्यथा आर्थिक बहिष्कार घालण्याचा इशारा यावेळी देण्यात आला

# ताकाला जायचं आणि भांड लपवायचं असं माझं धोरण नाही, मी काय साधू संत नाही : अजितदादा रोखठोक बोलले

दैनिक आपला विदर्भ







**मोर्शी/प्रतिनिधी** :राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेमध्ये बोलताना अजित पवारांनी निवडणुकीनंतरही लाडकी बहीण योजना सुरू राहील, असं आश्र्वासन दिलं आहे. तसंच आज कित्येक लोकांना माहिती नाही आणि ते शेतकऱ्यांच्या बाता मारतात, मी शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला आलो त्यामुळे मला शेतकऱ्यांच्या वेदना माहिती आहेत, असा टोला अजित पवारांनी लगावला आहे.

ताकाला जायचं आणि भांडं लपवायचं असं माझं धोरण नाही. मी काय साधू संत नाही. हाडामासाचा माणूस आहे. मी तुमच्या मतदारसंघात ४ हजार कोटींचा निधी दिला आहे. पुन्हा देवेंद्र भुयारला संधी द्या, असं आवाहन अजित पवारांनी केलं आहे.

वरुड मोर्शी मतदारसंघात अत्याधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक तो निधी दिला जाईल, हा अजित पवारांचा शब्द आहे. सगळी सोंगं करता येतात मात्र पैशाचं सोंग करता येत नाही. आपण सरकारमध्ये असल्याने आपण हे प्रत्यक्ष पैसे देऊन दाखवून दिलेलं आहे. लोकसभेच्या निवडणुकीत घटना बदलणार, संविधान बदलणार असा अपप्रचार करण्यात आला, त्याला मागासवर्गीय, अल्पसंख्याक समाज बळी पडला. आता मेहरबानी करा. देशात सगळीकडे विकासाचं काम सुरू आहे. सोयाबिनला, कापसाला चांगला भाव द्यायचा आहे, असं अजित पवार म्हणाले आहेत.

पुन्हा महायुतीचं सरकार निवडून आणा. सरकारने घोषणा केलेल्या सगळ्या भावंडांच्या, माय माऊलीच्या बहिणींच्या योजना चालू राहतील, असं आश्र्वासन अजित पवारांनी दिलं आहे.

अर्थमंत्रीपद चाटायचं का?

आम्ही केवळ लाडकी बहीण योजनेवरच थांबलो नाही तर ज्या गरीब मुली शिकू शकत नाहीत त्यांच्यासाठी योजनाा आणली. ५० टक्के शुल्क भरू शकत नसल्याने काही मुलींनी जीवन संपवलं. फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात मुली जीवन संपवत असतील तर या अर्थमंत्रीपदाला काय चाटायचं का? सत्ता येत राहील, जात राहील. माणूस जगला पाहिजे, मुलगी शिकली पाहिजे, असं वक्तव्य अजित पवारांनी केलं.

सर्व मुलींची फी भरण्याचा निर्णय सरकारने घेतला आणि विरोधक ओरडतात की सरकारने नको त्या योजना आणल्या. विरोधक लाडकी बहीण योजनेवरून टिंगल करायला लागले, भावासाठी काय आणणार? ४४ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांचं वीज बिल माफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. इथून पुढे शेतकऱ्यांना कृषी पंपाचं बिल भरावं लागणार नाही. मागच्या वीज बिलाची चिंता करू नका, ते वीज बिल माझ्यावर सोडून द्या, असं म्हणत अजित पवारांनी शेतकऱ्यांनाही दिलासा दिला आहे.

# लसन तडका महागला; लसूण ३२० ते ४०० पार

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे



**मालेगाव:** सर्वसामान्यांसाठी पुन्हा एकदा लसणाची फोडणी महागली आहे किरकोळ बाजारात सध्या लसूणचा दर थेट ३२० ते ४०० रुपये प्रति किलोपर्यंत वाढला आहे येणाऱ्या पुढील सणासुदीच्या काळात हा भाव आणखी वाढून ६०० रुपये प्रति किलोपर्यंत पोहचू शकतो अशी शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे त्यामुळे आता गृहिणींचे बजेट कोलमडणार हे नक्की लसणाला आहारात अनन्यसाधारण महत्त्व आहे मात्र यंदा लसणाची आवक कमी झाल्याने दर वाढतायत जुन्या लसणाची आवक जवळपास संपली असून नवीन लसूण उपलब्ध नसल्याने सध्या बाजारात लसणाचे दर प्रचंड वाढलेले आहेत यावर्षी देशातील लसणाच्या उत्पादनात घट होत असल्याने भाव वाढत आहेत आधीच महागाईने सर्वसामान्य नागरिक काटकसर करून आयुष्य जगत आहेत महागाईने प्रस्त असलेल्या नागरिकांनी एवढा महागडा लसूण विकत घ्यायचा तरी कसा असा प्रश्र्न सध्या सर्वसामान्याला सतावत आहे दरम्यान यापूर्वी जानेवारी महिन्यात सुद्धा लसणाच्या दरांचा मोठा भडका उडाला होता वाढलेला भाव कमी झाल्यानंतर आता पुन्हा ऑगस्टमध्ये भाव वाढले आहेत बाजारात सध्या लसूण ४०० रूपयांनी किरकोळ बाजारात विकला जातोय तर घाऊक बाजारात लसणाचा दर कमाल ३०० रुपयांपर्यंत वाढल्याचे पाहायला मिळत आहे लसूणच्या किंमती महाग झाल्यानंतर आता परत लसणाच्या किंमती कधी कमी होतील असा प्रश्र्न नागरिकांना भेडसावद आहे जानेवारी महिना ते मे महिना या कालावधीत लसणाचे उत्पादन केले जाते तर फेब्रुवारी महिन्यापर्यंत आवक सुरळीत होते या सर्वांचा परिणाम प्रत्येक नागरिकाला महागडा लसूण खावा लागणार आहे मुख्यत महाराष्ट्रात मध्य प्रदेश राजस्थान गुजरात आणि हिमाचल प्रदेश येथून लसणाची आवक होत असते भाव वाढत असल्याने याचा फटका सर्वसामान्यांना बसणार ने निश्र्चित झालं आहे



### गणेशोत्सव दरम्यान खड्ड्यांमुळे घटना घडली तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होईल त्यासाठी केडीएमसी आयुक्त जबाबदार- विश्वनाथ भोईर

**ठाणे/प्रतिनिधी** : खड्ड्यांमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. खड्ड्यांमुळे नागरिक आणि वाहन चालक त्रस्त आहेत. महापालिकेकडून खड्डे बुजवण्यासाठी जे प्रयत्न केले ते पाहिजे तसे झाले नाही. आता गणेशोत्सव सुरू होणार आहे .या दरम्यान एखादी घटना घडली, शहरात शांतता भंग झाली तर यासाठी फक्त आणि फक्त केडीएमसी आयुक्त जबाबदार राहणार नंतर आम्ही आमच्या परीने बघून घेऊ असा इशारा कल्याणचे शिवसेना शिवसेना आमदार विश्वनाथ भोईर यांनी दिला आहे. कल्याण मध्ये आज विविध काँक्रिटीकरण रस्त्याचे भूमिपूजन होते हा कार्यक्रम विश्वनाथ भोईर यांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी मोठ्या प्रमाणात शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोलापुरात युवा सेनेचे भर पावसात जोडेमार आंदोलन

दैनिक आपला विदर्भ




**सोलापूर/प्रतिनिधी** : राजकोट किल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळ्यानंतर महाराष्ट्रातील राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. महायुती सरकारच्या विरोधात महाविकास आघाडी सरकारच्यावतीने रविवारी संपूर्ण महाराष्ट्रात जोडे मारो आंदोलनाची हाक देण्यात आली होती. सोलापुरात शहर जिल्हा युवासेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले यांच्या नेतृत्वाखाली तसेच शहरप्रमुख विठ्ठल वानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी दुपारी चार हुतात्मा पुतळा येथे भर पावसात महायुती सरकारच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करून निषेध नोंदविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज कि जय, जय भवानी जय शिवाजी, या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय,भ्रष्ट्र आणि मस्तवाल सरकार मुर्दाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी युवा सेनेचे विद्यापीठ प्रमुख लहू गायकवाड, युवा सेने कॉलेज कक्ष प्रमुख तुषार आवताडे, अनिरुद्ध दहीवडे, सचिन हेगडे, विजय मोटे, दत्त खलाटे, अविनाश भोळे, विशाल चोरगे, अक्ष बिराजदार, प्रणित जाधव, राहुल कांबळे, प्रथमेश तपासे, सुभाष सातपुते, वैभव लोंढे, नितीन भोसले, गुरुनाथ शिंदे, विष्णू जगताप, गुरु बेंद्रे यांच्यासह युवासेनेचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्यापासून ते आजच्या महायुती सरकारकडून सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा तसेच महापुरुषांचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. छत्रपती शिवरायांचा पुतळा पडल्यानंतर शिवद्रोही सरकारकडून तर आता महाराष्ट्राचा अंत करण्याचा घाट घातला जात आहे.आगामी काळात शिवद्रोही महायुती सरकारचा अंत केल्याशिवाय शिवसेना गप्प बसणार नाही. शिवभक्त महायुतीच्या नेत्यांना लोणच्यासाठीसुद्धा शिल्लक ठेवणार नाहीत. इतकेच नव्हे तर महायुतीच्या नेत्यांना सोलापुरात सभा आणि जनआंदोलन करू देणार नाही.

### 'पश्चिमेकडून आलेल्या वाऱ्यामुळे शिवरायांचा पुतळा पश्चिमेकडेच कसा कोसळला?' जरांगेंना वेगळाच संशय!

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी** : काही दिवसांपूर्वी मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली होती. यावरू राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे. ज्या राजकोट किल्ल्यावर ही घटना घडली तिथे आज मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा विरोधक आणि सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल केला आहे.


नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

पश्चिमेकडून आलेल्या वाऱ्यामुळे पश्चिमेकडेच पुतळा कसा काय कोसळला? यात राजकारण होऊ नये, सरकारने याची चौकशी केली पाहिजे. कायद्यामध्ये बदल केला पाहिजे आणि कुठल्याच कॉन्ट्रॅक्टरला सोडलं गेलं नाही पाहिजे. त्याला आयुष्यभर जेलमध्ये टाकलं पाहिजे. सरकारनं महापुरुषांच्या स्मारकांकडे बारकाईनं लक्ष दिलं पाहिजे. असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, 'विरोधी पक्ष आणि सत्ताधारी दोघेही राजकारण करत आहेत. महाराष्ट्र बघतो आहे, तुम्हाला वाटत असेल तुम्ही शहाणे आहात. छत्रपतींच्या जीवावर कुणीही राजकारण करू नका. जनता तुमचा कार्यक्रम लावणार आहे. तुम्ही उघडे पडायला लागला आहात, इथे भांडणं झाली ती फक्त खुर्चंया मिळवण्यासाठी. यांना दुःख नाही. त्यांना जर अपमान वाटला असता ते या घटनेच्या मुळाशी गेले असते, इथे स्मारक सुद्धा उभा राहणं गरजेचं आहे.

# विद्युत खांब अवस्था धोकादायक : कनिष्ठ अभियंताचे दुर्लक्ष

## चतारी येथील चित्र, जीवितहानी होण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ



**पातूर :** पातुर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्राचा गेल्या काही महिन्यापासून गलथान कारभार सुरू असल्याचा फटका ग्रामस्थांना सहन करावं लागत आहे. चतारी येथे महादेव मंदिराच्या रस्त्यावर गेल्या दोन वर्षापासून लोखंडी विद्युत खांब पूर्णपणे जीर्ण झाला आहे. त्या खांबावरून विद्युत प्रवाह सुद्धा सुरू आहे. विद्युत खांबामध्ये वारंवार विद्युत शॉक येत असून,खांब जीर्ण झला, याबाबत ग्रामस्थांनी संबंधित सस्ती वीज उपकेंद्राच्या कनिष्ठ अभियंता गौरव निकुंबे यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या परंतु त्यांच्याकडून ग्रामस्थांच्या तक्रारीकडे हेतूपुरस्पर दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. कनिष्ठ अभियंता यांचा मनमानी कारभार सुरू असल्याने ग्रामस्थ वैतागले असून, याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन जीर्ण झालेल्या विद्युत खांब बदलण्याची मागणी होत आहे.

### वेळेस दखल न घेतल्यास मोठी दुर्घटना

जीर्ण झालेल्या लोखंडी विद्युत खांब बदलण्याची मागणी दोन वर्षापासून होत आहे. परंतु महावितरण विभागाकडून अद्यापही दखल घेतली जात नाही, वेळेस दखल न घेतल्यास मोठी जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही

**गेल्या दोन वर्षापासून लोखंडी विद्युत खांब जीर्ण झाला आहे. याबाबत सस्तीच्या वीज उपकेंद्राकडे वारंवार तक्रारी केल्या परंतु अद्यपही दखल घेतली जात नसल्याने जीर्ण विद्युत खांब कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही**

**–वैभव डोंगरे**

**ग्रामस्थ चतारी**

### दुर्घटना झाल्यास जबाबदार कोण ?

**लोखंडी विद्युत खांब दोन वर्षापासून जीर्ण अवस्थेत आहे. ते कधीही कोसळू शकते, त्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही, जर मोठी दुर्घटना झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्र्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहे.**

## वृत्तविशेष...

### विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुती मोठ्या प्रमाणावर जागा जिंकेल; केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव हे आज धुळे शहराच्या दौऱ्यावर आले असताना त्यांनी जैन समाजाचे गुरु आचार्य रत्न सुंदरसुरेश्र्वर जी महाराज यांचे दर्शन घेतले यावेळी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आचार्य रत्न सुंदरसुरेश्र्वर यांचे दर्शन घेण्याचा योग आला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक पेड माँ के नाम या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले आहे, येणाऱ्या काळात महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन होणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुती मोठ्या प्रमाणावर जागा जिंकेल असा विश्र्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या झालेल्या पुतळ्यात घटने प्रकरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर माफी मागितली असून याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

### भारतीय जनता पार्टी बुलढाणा जिल्ह्याच्यावतीने महविकास आघाडीच्या विरोधात निषेध आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलडाणा :** आज भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले अखंड हिंदुस्थान चे दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे ही समस्त शिवप्रेमी व समस्त हिंदूंसाठी दुर्दैवाची बाब आहे.मात्र यावर महाविकास आघाडी महाराजांच्या नावाने गालीच्छ राजकारण करत आहे ,यांचा निषेध आज करण्यात आला , यावेळी बुलढाणा जिल्हयाचे भाजपाचे नेते तथा जिल्हा अध्यक्ष मा. डॉ गणेशजी मान्टे ,माजी आमदार मा.विजयराजजी शिंदे,युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मा.विनायकभाऊ भाग्यवंत तथा भारतीय जनता पक्षाचे नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुरेशा पावसामुळे बळीराजा आनंदित, बैलपोळा करणार जल्लोषात साजरा



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** यंदा सुरुवातीला पाऊस कमी झाला असला तरी परतीचा पाऊस चांगला झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण बघायला मिळते. बैलपोळ्याच्या पूर्व संधेला बाजारपेठांमध्ये बैलाच्या सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पोळ्याचा सण मोठ्या उत्साहात साजरा होणार, अशा शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### आईस्क्रीममध्ये बोट आढळल्यानंतर आता कोल्ड कॉफीमध्ये झुरळ! मालाडमध्ये पुन्हा संतापजनक प्रकार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** खाण्यापिण्याच्या बाबतीत नागरिक नेहमीच सतर्क असतात. असे असले तरी ऑनलाइन माध्यमातून किंवा हॉटेलमध्ये झालेल्या दुर्लक्षामुळे अनेकदा ग्राहकांना मनस्तापाला सामोरे जावे लागते. मालाड मधील आईस्क्रीममध्ये मानवी बोट आढळल्याची घटना घडल्याने मुंबईभरातून यावर संताप व्यक्त करण्यात आला. तसेच ऑनलाइन फूड डिलीव्हरीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. हे बोट तिथल्या कर्मचाऱ्याचे होते,असे काही दिवसांनी तपासात समोर आले होते. ही घटना ताजी असतानाच आता कोल्ड कॉफीमध्ये झुरळ आढळल्याचे तक्रार करण्यात आली आहे.

# तलवारीने वार, पोलिसांनी केला गोळीबार!

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एका परिवाराला बेदम मारहाण होत असल्याच्या माहितीवरून कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या पथकावर अट्टल गुन्हेगाराने आधी दगडफेक व नंतर धारधार तलवारीने वार केला. यावेळी पोलिसांनी स्वरक्षणासाठी तीन गोळ्या झाडल्या. या चकमकीत अंधाराचा फायदा घेत अट्टल गुन्हेगार व्यक्ती पसार होण्यात सफल झाला. या घटनेत संभाव्य भीषण दुर्घटना टळली असून तीन पोलीस किरकोळ जखमी झाले आहे.

सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या मलकापूर शहरातील मुक्ताई नगर मार्ग लगतच्या म्हाडा वसाहत मध्ये शनिवारी, ३१ ऑगस्ट रोजी मध्य रात्री उशिरा हा थरारक घटनाक्रम घडला आहे. यामुळे मलकापूर तालुक्यासह बुलढाणा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. वरिष्ठ पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार स्थानिक म्हाडा कॉलनीतील रहिवासी मनोजसिंह टाक हा तडीपार व कुख्यात गुन्हेगार आहे. तो शनिवारी, ३१ ऑगस्ट रोजी मलकापूर शहरात दाखल झाला.

म्हाडा वसाहतमध्ये राहणाऱ्या टाक याने रात्री उशिरा घरात डुक्कर येतात या क्षुल्लक कारणावरून त्याच परिसरातील बामंदे कुटुंबीयांसोबत वाद घातला. या वादाचे पर्यवसन भीषण हाणामारीत झाले. आरोपी टाक याने बामंदे परिवारातील पती-पत्नी वर हल्ला चढविला. लोखंडी रॉड तथा तलवारीचा वापर करीत त्यांना गंभीररीत्या जखमी केले.




दरम्यान, या घटनेची माहिती मलकापूर शहर पोलीस ठाण्याला काही नागरिकांनी दिली. घटनेचे गांभीर्य आणि टाक याचे कारनामे माहीत असल्याने मलकापूर शहर पोलिसांचे 'डीबी' पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या पथकाने आधी गंभीर जखमी बामंदे पती-पत्नीला उपचारार्थ उप जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे रवाना केले. या धामधुमीत मनोजसिंह टाकची पत्नी विटेच्या सहाय्याने स्वतःचे डोके फोडण्याचा प्रयत्न करीत होती, अशी माहिती आहे. हा प्रकार झाडाझुडपात लपलेल्या मनोजसिंह टाक च्या लक्षात येताच त्याने प्रारंभी पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली. एवढ्यावरच न थांबता त्याने सरळ तलवार हातात घेऊन पोलिसांच्या दिशेने चाल केली. एवढ्यावरच न थांबता पोलिसांवर तलवारीने हल्ला केला.

सुदैवाने दक्ष असलेल्या पोलिसांनी त्याचा हा प्राणघातक हल्ला चुकविला. आरोपी बेफाम असल्याने तो पुन्हा हल्ला करण्याच्या बेतात होता. त्यामुळे त्याच्या हल्ल्यापासून बचावासाठी ( स्वरक्षणासाठी) एकापोलीस कर्मचाऱ्याने आपल्या जवळील अग्नी शस्त्राने आरोपीला धाक दाखविण्याचा प्रयत्न केला. हवेत दोनदा गोळीबार केला. मात्र तो आरोपी नियंत्रणात येत नसल्याने अखेर नाईलाजास्तव त्या कर्मचाऱ्याने आरोपीच्या दिशेने कमरेखालील भागात पायाकडे गोळी झाडली. जवळपास तीन गोळ्या झाडण्यात आल्या.

निर्भय पोलिसांच्या तिखट प्रतिकाराने टाक याचे अवसान गळाले. यामुळे भेदरलेल्या टाक याने रात्रीच्या अंधाराचा व झाडाझुडपांचा फायदा घेत आणि स्वतःची पत्नी व मावशीच्या सहकार्याने घटनास्थळावरून पोबारा केला. यावेळी आरोपी मनोजसिंह टाक ची पत्नी, त्याची मावशी, मावशी चा मुलगा व भावाचा मुलगा सुद्धा घटनास्थळी हजर होते. या हल्ल्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्र्वर वरगे, पोलीस उप निरीक्षक सुनील भुसळे, पोलीस कर्मचारी नासिर व मतीन किरकोळ जखमी झाले. घटनास्थळी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून तात्काळ पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांना घटनेची माहिती देण्यात आली. यामुळे पोलिसांची अतिरिक्त कुमक म्हाडा वसाहत परिसरात पाठविण्यात आली.

### आंदोलनाला आंदोलनानं प्रत्युत्तर हा भाजपचा मूर्खपणा, राऊतांची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवद्रोही सरकारविरोधात आम्ही जोडे मारो आंदोलन करणार आहे. आंदोलनाला आंदोलनानं प्रत्युत्तर देणं हा भाजपचा मूर्खपणा असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी केला आहे. आम्ही फक्त जोडे मारो करतोय , शिवाजी महाराजांच काळ असता तर तुमचा कडेलोट केला असता, असे देखील संजय राऊत म्हणाले. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

संजय राऊत म्हणाले, या सरकारमध्ये वारंवार शिवाजी महाराजांचा अपमान होतो. राज्यपाल कोश्यारी यांनी अपमान केला, माफी मागितली नाही. मंत्र्यांनी अपमान केला माफी मागितली नाही. सध्याचे केसरकर म्हणतात दु:ख कशाला करायचे वाईटातून चांगले घडते . ही विकृती आहे. भ्रष्टाचाराची स्पर्धा सुरू आहे. प्रधानमंत्र्यांनी माफी मागितली असेल त्यांचा प्रश्न आहे.

# शेतकऱ्यांशी अर्वाच्च भाषेत बोलत असाल तर धडा शिकवणारच

## रविकांत तुपकरांचा तानाजी सावंतांना इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना एका शेतकऱ्याने प्रश्न विचारताच त्यांनी शेतकऱ्याची औकातच काढली. सुपारी घेऊन कार्यक्रमात उभे राहून बोलायचं नाही, औकातीत राहून बोलायचे.

औकातीत राहून विकास करून घ्यायचा, आम्ही उडत्याचे मोजतो, अशी दमबाजी तानाजी सावंत यांनी शेतकऱ्याला केली. आता यानंतर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी तानाजी सावंत यांना थेट इशाराच दिला आहे.



**नेमकं काय म्हणाले होते तानाजी सावंत?**

डोंगरवाडी गावात पालकमंत्री तानाजी सावंत यांचा गाव संवाद दौरा सुरु होता. यावेळी तानाजी सावंत गावामध्ये बंधाऱ्याच्या कामाविषयी सांगत होते. गावकऱ्यांनी बंधाऱ्यास गेट बसवून प्रश्न मिटणार नाहीत, असे म्हणताच तानाजी सावंत गावकऱ्यांवर संतापले. खाली बसा आपण विकासाचे बोलायला आलो आहोत. मी इंजीनियर आहे टेक्निकल आहे. एखाद्याची सुपारी घेऊन चांगल्या कामात मिठाचा खडा टाकायचा नाही. आम्हालाही कळत कोणाची तरी सुपारी घ्यायची उभा राहून बोलायचं आणि चांगल्या कामात मिठाच्या खडा टाकायचा आम्हीही उडत्याची मोजतो आपापल्या औकातीत राहून बोलायचं, औकातीत राहून विकास करायचा, असे म्हणत तानाजी सावंत यांनी ग्रामस्थांना दम दिला होता.



### अर्वाच्च भाषेत बोलत असाल तर धडा शिकवणारच

**रविकांत तुपकर म्हणाले की, हे अतिशय दुर्दैवी आहे. सत्तेतील लोकांनी अतिशय विनम्र राहायला हवे. सरकारच्या भरवशावर तुम्ही जिवंत आहात. शेतकऱ्यावर जर कोणी दादागिरी करत असेल, अर्वाच्च भाषेत बोलत असेल तर हे आम्ही कदापि खपवून घेणार नाही. आम्ही त्या नेत्याला धडा शिकविणार आहे, असा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी ॲट्रॉसिटी सारखा कायदा आणला पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली आहे.**

### ...तर बेमुदत अन्नत्याग आंदोलन करू

**दरम्यान, सोयाबीन, कापूस आणि शेती पिकाला योग्य भाव मिळावा, १०० टक्के पिक विमा मिळावा, तसेच इतर मागण्या ३ सप्टेंबरपर्यंत मंजूर करा. अन्यथा ४ सप्टेंबरपासून सिंदखेडराजा येथील राजमाता जिजाऊ यांच्या राजवाड्यासमोर बेमुदत अन्न त्याग आंदोलन करू, असा इशाराही रविकांत तुपकर यांनी दिला आहे.**

# रानांत शेळीवर बिबट्याचा हल्ला

## किनगाव जट्टू, खंडाळा परिसरातील घटना; शेतकरी भयभीत

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील किनगाव जट्टु येथील शेतकरी सुरेश कुंडलीराम आडे यांच्या शेळीवर हल्ला..

शुक्रवारी ३० तारखेला ला सुरेश आडे हे खंडाळा शिवारातील गट नंबर ८५ मध्ये आपल्या शेतात शेळ्या चारत आसतांना अचानक बिबट्याने त्यांच्या शेळीवर हल्ला करुन बिबट्याने गळा दाबला हे पाहुन सुरेश आडे यानी नघाबरता बिबट्याला दगड व काडीच्या सहायाने शेळीचा प्राण वाचवण्यासाठी प्रयत्न केला. परंतु बिबट्या च्या हलल्याने शेळी जख्मी होउन बेशुध झाली. जखमी अवस्थेत सुरेश आडे हे शेळीला गोठ्यावर घेऊन आले. त्यावर प्राथमिक उपचार करुन वनविभाग यांच्या कडे सदर घटनेची माहिती दिली.



घटनेच्या दुसऱ्या दिवशी वनविभागचे अधीकारी घटनास्थळी येऊन घटनेचा पंचनामा केला.या घटनेमुळे गावातील शेतकरी व शेतमजुरात भितीचे वातावरण पसरले आहे.

गांवकर्यांच्या जिवीतास बिबट्या पासुन धोका होऊ नये म्हणुन वनविभागाने काळजी घ्यावी व बिबट्याचा शोध लाऊन त्याला मानव वस्तीपासुन दुर सोडान्यात यावे असे शेतकरी व शेतमजुरात यानी म्हटले आहे. सदर नुकसान साठी शासनाने शेतकऱ्याला आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी आणि ग्रामस्थ यांनी मागणी केली आहे.

### जिल्ह्यात मुसळधार पावसाने घातला थैमान ,गावाकऱ्यांत भीतीचे वातावरण

**जालना/प्रतिनिधी :** मंठा शहराबरोबर तालुक्यातील आंबोडा कदम गावात अतिवृष्टी झाल्याने नदी नाले तुडुंब भरून वाहत आहे. गावात पाणी शिरले आहे. शेतालाही तळ्याचे स्वरूप आले आहे. शेतामध्ये जिकडे तिकडे पाणीच पाणी वाहत असल्याने खरीपानची पिके खरडून गेले आहे. तर काही ठिकाणी पीक पाण्यात बुडाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं आहे. त्यामुळे या गावचा संपर्क ही तुटला आहे. गावाजवळ लघु प्रकल्प असल्याने तो ही तुडुंब भरून वाहत असल्याने हा प्रकल्प फुटण्याची भीती व्यक्त केल्या जात असल्याने गावाकऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले आहे. पाऊसाचा जोर गेल्या तीन तासापासून सुरु असल्याने भीती व्यक्त केली जात आहे.



# भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन व महाविकास आघाडीचा निषेध

## राजकमल चौक येथे नारेबाजी..

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जो पुतळा कोसळला ही बाब संपूर्ण महाराष्ट्राच्या साठी व देशाच्यासाठी दुर्दैवाची आहे या प्रकरणावर देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी जाहीर माफी सुद्धा मागितलेली आहे,मात्र या संदर्भामध्ये महाविकास आघाडी ज्या पद्धतीचे गलिच्छ राजकारण करीत आहे याचा विरोधात आज संपूर्ण महाराष्ट्रभर भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आंदोलन केले व आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन करुन महाविकास आघाडीचा निषेध केला, अमरावती येथील राजकमल चौक येथे राज्यसभेचे खासदार डॉक्टर श्री अनिलजी बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता युवा मोर्चा अमरावती जिल्हा ग्रामीण व अमरावती शहर जिल्हा च्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आंदोलन केले यावेळी बोलत असताना प्रामुख्याने डॉक्टर श्री अनिलजी बोंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की मध्य प्रदेश येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तत्कालीन मुख्यमंत्री कमलनाथ मुख्यमंत्री असताना काढून टाकण्यात आला, तसेच डिस्कवरी ऑफ इंडिया या पुस्तकामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान जनक उल्लेख केलेला आहे या सर्व वेळी काँग्रेस आणि त्यांचे मित्र पक्ष शांत होते, यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हारअर्पण करून पूजन करण्यात आले.

एकंदरीतच यावेळी संपूर्ण राजकमल चौक छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, या नाऱ्यांनी गुंजला, यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या सह, ग्रामीण महामंत्री विवेक गुल्हाने, भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री बादल कुलकर्णी, मा.आमदार रमेशजी बुंडीले,युवा मोर्चा अमरावती जिल्हा ग्रामीण अध्यक्ष अजिंक्य वानखडे, विधानसभा प्रमुख प्रवीण तायडे गोपाल चंदन,युवा मोर्चा प्रदेश सचिव प्रणित सोनी, हरिष साऊरकर,युवा मोर्चा महामंत्री प्रवीण रुद्रकर, तुषार चौधरी श्याम साहू, सौरभ पिंपळकर,करणं धोटे, भूषण काळमेघ, प्रणित खवले, युवा मोर्चा पदाधिकारी अखिलेश किल्लेदार,यश शर्मा, अनिताताई तिखिले, मनोहर भाऊ लेवटे, कुंदन भाऊ यादव,विशाल भाऊ काकड, समीर हावरे, अतुल भाऊ गोळे, मनीष मेन,प्रणित खवले , कर्ण धोटे, भूषण काळमेघ, निखिल घुरडे, ललित ठाकूर, शुभम खेर्डे,सागर माहुरे, रोषण कॅट्यारमल, अनुज वाटणे,व निरंजन दुबे, ऋषीकेश चौबे, आशुतोष शर्मा, गोलू जोशी, यश पट्टा, यश शर्मा, अनिकेत विश्वकर्मा, रोहित गुप्ता,सूरज वासनिक,युवराज पवार इत्यादी उपस्थित होते ..

